18-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/17/2025 10:27 PM Page 1



घरगुती बायोगॅस प्लांटद्वारे इंधन बचतीचा यशस्वी प्रयोग
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



मुंबईत आयपीएल कर्णधारांची २० रोजी बैठक
पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, १८ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 195 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 18 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# पेपरफुटी प्रकरण; सहाय्यक प्राध्यापक निलंबित

## राजकीय पक्ष, विद्यार्थी संघटना आक्रमक | आगशी पोलिसात तक्रार, राज्यपालांकडून गंभीर दखल

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १७ : गोवा विद्यापीठातील पेपरफुटी प्रकरणामुळे राज्यात खळबळ माजली असून, भौतिक आणि उपयोजित विज्ञान शाखेचे सहाय्यक प्राध्यापक प्रणव पी. नाईक यांना पुढील आदेश येईपर्यंत सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणावरून राजकीय पक्ष आणि विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या असून, एनएसयूआयने आगशी पोलिस स्थानकात तक्रार दाखल केली आहे. तसेच अभाविपने विद्यापीठाविरोधात जोरदार मोर्चा काढला आहे.**

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातून सहाय्यक प्राध्यापक प्रणव नाईक यांनी एका विद्यार्थिनीला मदत करण्यासाठी प्रश्नपत्रिका चोरल्याचा आरोप आहे. ही बाब उघडकीस आल्यानंतर विद्यापीठ प्रशासनावर टीकेची झोड उठली. वाढत्या दबावानंतर आणि विद्यार्थी संघटनांच्या आंदोलनानंतर विद्यापीठ प्रशासनाने नाईक यांना चौकशी होईपर्यंत निलंबित केले. विद्यापीठाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन सदस्यीय समिती स्थापन केली असून, ४८ तासांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) प्रश्नपत्रिका चोरीचे प्रकरण सिद्ध झाल्यास सहाय्यक प्राध्यापकावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. तसेच संबंधित विद्यार्थिनीचे मागील सेमिस्टरचे गुण रद्द करून तिच्यावरही कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ठरावीक विद्यार्थ्यांना मदत करून अन्य विद्यार्थ्यांवर अन्याय केला जाणार नाही, असे अभाविपने स्पष्ट केले आहे.

एनएसयूआय आणि युवक काँग्रेसने आगशी पोलिस स्थानकात सहाय्यक प्राध्यापक प्रणव नाईक यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकारामुळे विद्यापीठाच्या विश्वासार्हतेला धक्का पोहोचला आहे. याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे, असे एनएसयूआयने म्हटले आहे.

या प्रकरणावर बोलताना गोवा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हरिलाल मेनन यांनी, प्रश्नपत्रिका चोरीबाबत कोणतीही तक्रार अद्याप प्राप्त झालेली नाही. सहाय्यक प्राध्यापक प्रणव नाईक यांनी सहकारी प्राध्यापकाच्या केबिनमधून रसायने घेण्यासाठी परवानगीशिवाय प्रवेश केला होता. मात्र प्रश्नपत्रिका चोरीची बाब अद्याप सिद्ध झालेली नाही, असे स्पष्ट केले. कुलगुरू मेनन यांच्या मते, सप्टेंबर २०२४ मध्ये डॉ. नाईक यांनी प्राध्यापक कौस्तुभ आर. एस. प्रियोलकर यांच्या केबिन उघडल्याच्या प्रकरणावरून वाद निर्माण झाला होता.

भौतिकशास्त्र विभागाचे डीन आणि प्रमुख डॉ. रमेश पै यांनी स्पष्ट केले की, परीक्षेच्या प्रक्रियेबाबत कोणतीही अधिकृत तक्रार मिळालेली नाही. केबिन उघडण्याचा प्रकार सोडला, तर प्रश्नपत्रिका चोरीबाबत कोणतीही तक्रार माझ्याकडे आलेली नाही, असे त्यांनी सांगितले.



सूत्रांच्या माहितीनुसार, सप्टेंबरमध्येच या प्रकरणाचा सुगावा लागला होता. इतर प्राध्यापकांनी सहाय्यक प्राध्यापकाला मुद्देमालासह पकडले होते. त्यानंतर चौकशी करण्यात आली आणि दोषी आढळल्यानंतर त्याच्या कर्मचारी फाईलमध्ये ताशेरे ओढण्यात आले. मात्र, विद्यापीठाची विश्वासार्हता डागाळण्याच्या भीतीने कठोर कारवाई टाळण्यात आली होती. राज्यपाल श्रीधरन पिल्लई यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत विद्यापीठ प्रशासनाकडून तात्काळ अहवाल मागवला आहे. तसेच, या प्रकरणी राजकीय पक्षांनी केलेल्या विविध प्रतिक्रिया आणि आरोपांचीही त्यांनी नोंद घेतली आहे. या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सोमवारी सकाळपासून अभाविप आणि गोवा फॉरवर्ड विद्यार्थी संघटनेसह विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठात निदर्शने केली. एनएसयूआयने विद्यापीठ प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# गोव्यातील माध्यान्ह भोजन सेवेत अक्षय पात्राचा प्रवेश

▶ नव्या स्वयंसाहाय्य गटांना नवी परवानगी नाही

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** गोव्यातील शालेय माध्यान्ह भोजन सेवांमध्ये अक्षय पात्र संस्थेचा समावेश झाल्यामुळे राज्य सरकारने नवीन स्वयंसाहाय्य गटांना परवानगी न देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता कायम राखण्याचे बंधन घालून विद्यमान स्वयंसाहाय्य गटांना कामकाज सुरू ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी साळगाव येथे अक्षय पात्राच्या नवीन स्वयंपाकघराच्या उद्‌घाटनप्रसंगी ही घोषणा केली. हे स्वयंपाकघर देशातील ७८ वे असून, प्रायोगिक तत्वावर साळगाव, कळंगुट आणि शिवोली मधील इयत्ता नववी आणि दहावीच्या सुमारे २,५०० विद्यार्थ्यांना निरोगी जेवण पुरवले जाईल.



विद्यार्थ्यांना दर्जेदार अन्न देणे हा त्यांचा हक्क आहे. आम्ही नवीन स्वयंसाहाय्य गटांना परवानगी देणार नाही. विद्यमान गटांनी अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता राखावी. जर ते दर्जेदार अन्न पुरवत नसतील, तर त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल, असे सावंत म्हणाले. हे स्वयंपाकघर पूर्णपणे स्वयंचलित असून कठोर स्वच्छता मानकांचे पालन करते. स्वयंपाकासाठी स्वयंचलित रोटी मेकर आणि इतर अत्याधुनिक यंत्रांचा वापर केला जातो. हे मॅन्युअल नाही, स्वयंचलित आहे. भांडी निर्जंतुक केली जातात आणि विद्यार्थ्यांना गरम व स्वच्छ अन्न दिले जाईल, असे सावंत यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी असेही स्पष्ट केले की, भविष्यात शालेय वेळापत्रकात बदल झाल्यास अक्षय पात्र आपल्या सेवांचा विस्तार करण्यास तयार आहे. गरज भासल्यास, संस्थात्मक स्वयंपाकघर रुग्णालये आणि तुरुंगांमध्येही अन्नपुरवठा करेल, असेही त्यांनी सांगितले.

दक्षिण गोव्यात दुसरे स्वयंपाकघर उभारण्यासाठी अक्षय पात्र

पान २ ▶

# कोणत्याही विकास प्रकल्पाच्या परवानगीपूर्वी जनसुनावणी बंधनकारक : प्रभू

## गोव्याचा विकास स्थानिकांचे प्रश्न विचारात घेऊनच होणे आवश्यक | प्रभू यांची रोखठोक भूमिका

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**केपे, दि. १७ :** कोणताही विकास प्रकल्प सुरू करण्यापूर्वी सरकारने आधी जनसुनावणी घेणे आवश्यक असल्याचे माजी केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी म्हटले आहे. स्थानिक लोकांच्या अडचणी आणि समस्या जाणून घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी सरकारने करू नये या मताशी आपण ठाम असल्याचेही प्रभू म्हणाले. वेळसांवमध्ये सध्या सुरू असलेले डबल ट्रॅकिंगचे काम आणि स्थानिकांच्या घरांसमोर भराव टाकून त्यांचा बंद केलेला प्रवेश या पार्श्वभूमीवर प्रभू यांना विचारले असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. याबाबत आपण गरज पडल्यास केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशीही बोलेन असेही संकेत त्यांनी दिले.

कोणताही पायाभूत सुविधांचा प्रकल्प राबवताना आधी जनसुनावणी घेणे गरजेचे असल्याचे माजी केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी म्हटले आहे. १९९८ साली अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात पर्यावरण मंत्री असताना आपण हा कायदा सर्वप्रथम देशात केला होता, असेही प्रभू म्हणाले. कोणताही प्रकल्प अंमलात आणण्यापूर्वी किंवा कोणत्याही प्रकल्पाला परवानगी देण्यापूर्वी जनसुनावणी करणे कायद्याने अत्यावश्यक आहे. ती जर नाही केली गेली तर न्यायालयात अशा प्रकल्पांना आव्हान दिले जाऊ शकते, असा स्पष्ट इशारा प्रभू यांनी दिला आहे . डबल ट्रॅकिंगच्या बाबतीत बोलताना प्रभू म्हणाले की, ते रेल्वेमंत्री असताना कोकण रेल्वेच्या डबल ट्रॅकिंगच्या कामाला महाराष्ट्रातून सुरुवात झाली होती. त्याच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. गोव्याच्या बाबतीत बोलायचे झाल्यास स्थानिक लोकांचे प्रश्न विचारात घेऊनच गोव्याचा विकास झाला पाहिजे ही जनतेची ठाम भूमिका असली पाहिजे, असे प्रभू म्हणाले. गोव्याचे बहुतेक स्थानिक लोक मासेमारी शेती, बागायती आणि पर्यटन व्यवसायावर जगतात. या व्यवसायांच्या वृद्धीसाठी रेल्वे निश्चितच फायद्याची ठरू शकते. मात्र, अशा कोणत्याही प्रकल्पासाठी जर जागा घ्यायची असेल तर स्थानिक लोकांच्या परवानगीशिवाय ते होता कामा नये. त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे, असे मत प्रभू यांनी व्यक्त केले.

सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीमध्ये देखील अशा अनेक तक्रारी आहेत. तिकडच्या जनतेने आपल्या जमिनी दिल्या नसत्या तर कोकण रेल्वे कदाचित आलीच नसती. मात्र, या जमिनीचा त्यांना योग्य मोबदला मिळाला नसल्याच्या तक्रारी आजही असल्याचे प्रभू यांनी अधोरेखित केले. वेळसांवमध्ये जर लोकांच्या घरासमोर माती टाकून त्यांची वाट बंद केली गेली असेल तर ही अंमलबजावणी करताना झालेली चूक आहे, असेही प्रभू यांनी स्पष्ट केले. स्थानिक लोकांची अडचण करून कोणताही प्रकल्प येता कामा नये अशी आपली ठाम भूमिका असून याबाबत गरज पडल्यास केंद्रीय रेल्वे मंत्र्याशी बोलेन असेही प्रभू यांनी आश्वासन यावेळी दिले. केपे शिमगोत्सव सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश प्रभू यांनी उपस्थिती लावली असताना माध्यमांनी त्यांच्याशी संवाद साधला.

# १ एप्रिलपासून शाळा सुरू करण्यास पालकांचा विरोध कायम

## शिक्षण संचालनालयाबाहेर जोरदार निदर्शने | निर्णय त्वरित मागे घ्या



■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** १ एप्रिल २०२५ पासून शाळा सुरू करण्याच्या निर्णयाविरोधात पालकांनी सोमवारी पर्वरी येथील शिक्षण संचालनालयाबाहेर जोरदार निदर्शने केली. पालकांनी या निर्णयाला विरोध करत तो त्वरित मागे घेण्याची मागणी केली आहे.

पालक प्रतिनिधी सेसिल रॉड्रिग्ज यांनी याबाबत सांगितले की, शिक्षण विभागाने राजपत्र अधिसूचनेद्वारे केवळ पाच दिवसांचा उल्लेख केला आहे. पालक आणि शिक्षकांना विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. शालेय परीक्षा संपल्यानंतर केवळ दोन ते तीन दिवसांची सुट्टी मिळत आहे, जी मुलांसाठी अन्यायकारक आहे. यामागचे योग्य कारणही आम्हाला मिळालेले नाही.

रॉड्रिग्ज यांनी सांगितले की, मार्च महिन्यातील तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय चुकीचा आहे. अनेक शाळांमध्ये पाण्याची व्यवस्था नाही. वीजपुरवठा खंडित झाल्यास वीज पुरवण्यासाठी जनरेटरची सोयही नाही. त्यामुळे शालेय वातावरण मुलांसाठी प्रतिकूल ठरू शकते.

दुसऱ्या एक पालक साबी मस्कारेन्हास यांनी मागील वर्षीच्या उष्णतेचा संदर्भ देत प्रश्न उपस्थित केला की, गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गेल्या वर्षी उष्णतेच्या तीव्रतेमुळे दहावी आणि बारावीच्या परीक्षा तीन आठवडे पुढे ढकलल्या होत्या. मग यावर्षी परिस्थिती बदलली आहे का ?

पालक प्रसाद हळणकर यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणावर नाराजी व्यक्त करत म्हटले की , आम्ही या प्रक्रियेत भागधारक आहोत, तरीही आम्हाला विश्वासात घेतले जात नाही. केंद्र सरकारचे निर्णय राज्यात बळजबरीने राबवले जात आहेत. हे लोकशाहीसाठी घातक आहे.

टोनी कार्डोझो यांनी शाळांमधील सुविधांच्या अभावाकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, राज्यात अनेक शाळांमध्ये पंख्यांची सुविधाही नाही. निर्णय घेणाऱ्यांनी एक दिवस तरी अशा परिस्थितीत काम करून पाहावे आणि मग मुलांना वर्गात बसवण्याचा निर्णय घ्यावा.

पालकांच्या या विरोधामुळे शिक्षण विभागाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सरकार पालकांच्या मागण्यांकडे कोणते पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## निवडक

### कुपवाड्यात चकमकीत दहशतवादी ठार

**जम्मू, दि. १७ :** जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवरील खुरमोरा राजवार भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला आणि काही दहशतवादी वेढा तोडून पळून जाण्यात यशस्वी झाले. पळून गेलेल्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांचे ऑपरेशन सुरूच आहे. एक सैनिक जखमी झाला आहे. येथील अधिकाऱ्यांनी सांगितले की, जचलदाराच्या क्रुम्हुरा गावात अतिरेकी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी तेथे घेराबंदी आणि शोध मोहीम सुरू केली. दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केल्यानंतर शोध मोहिमेचे रूपांतर चकमकीत झाले. सकाळपासून सुरू असलेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला असून त्याच्याकडून एक असॉल्ट रायफलही जप्त करण्यात आली आहे.

------------

### मतदानकार्ड आता आधारकार्डशी लिंक?

**नवी दिल्ली, दि. १७ :** निवडणूक आयोग आता मतदान कार्ड आधारकार्डसोबत लिंक करण्याची तयारी करत आहे. निवडणुकीतील पारदर्शकता वाढवण्याच्या उद्देशाने, मतदार ओळखपत्र आधारशी जोडण्याची प्रक्रिया आता जलद करण्यात येणार आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाची एक महत्त्वाची बैठक पुढील आठवड्यात होणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि निवडणूक आयुक्त विवेक जोशी, केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, विधिमंडळ विभागाचे सचिव राजीव मणी आणि यूआयडीएआयचे सीईओ भुवनेश कुमार बैठकीत सहभागी होतील. २०२१ मध्ये लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ मध्ये सुधारणा केल्यानंतर निवडणूक आयोगाने मतदारांकडून स्वेच्छेने आधार क्रमांक गोळा करण्यास सुरुवात केली. निवडणूक आयोगाने अद्याप आधार आणि मतदार ओळखपत्र डेटाबेस लिंक केलेले नाहीत. ज्या मतदारांना डुप्लिकेट ईपीआयसी नंबर दिला आहे त्यांना एक नंबर दिला जाणार आहे, असे निवडणूक आयोगाने सांगितले होते. समान ईपीआयसी क्रमांक असल्याने मतदार बनावट आहेत असा अर्थ होत नाही, परंतु मतदार फक्त ज्या मतदारसंघात नोंदणीकृत आहे तिथेच मतदान करू शकतो.

--------------

### अमेरिकेला चक्रीवादळाचा तडाखा

**वॉशिंग्टन, दि. १७ :** अमेरिकेतील सहा राज्यांना सध्या चक्रीवादळाने घेरले असून त्यात ३४ जणांना जीव गमवावा लागला आहे. ही सर्व राज्ये पश्चिमेकडील आहेत. येथील अर्कांसस, कॅन्सस, मिसुरी, इलिनॉय, मिसिसिपी आदी राज्यांमध्ये एकूण २६ वादळे आल्याची माहिती आहे. मिसुरीत सर्वाधिक १२ जणांना वादळामुळे जीव गमवावा लागला. पश्चिम अमेरिकेतील कोट्यवधी लोक या वादळांच्या विळख्यात आहेत. लाखो घरातील वीजपुरवठा वादळामुळे बाधित झाला आहे. धुळीच्या वादळामुळे ५० हून अधिक वाहनांचे अपघात झाले. यात आठ जणांचा मृत्यू झाला. मिसिसिपीत सहा जणांचा वादळामुळे मृत्यू झाला असून तीन जण बेपत्ता आहेत. ताशी १०० किलोमीटर वेगाने धुळीचे वादळ पुढे सरकत आहेत. यात घरे, वाहने, रस्ते, इमारतींचे नुकसान होत आहे.

### हवामान

कमाल : ३८ किमान : २५
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,३५५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०२,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७४,३६५ .७७ ↑ (११.१६ )
निफ्टी : २२,५०८. ७५ ↑ (१११.९५)